# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ३१

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **गुरुवार दिनांक २२/०५/२०२५ दुपारी ०४-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ४. | श्री.किशोर सुडके | सहाय्यक आयुक्त |
| ५. | श्री.बाळासाहेब तट्टू | मुख्यलेखाअधिकारी |
| ६. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ७. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ८. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता |
| ९. | श्री नवनीत सोनवणे | कार्य. अभियंता |
| १०. | श्री एम आर शेख | आरोग्याधिकारी |
| ११. | चंद्रकांत मोरे | लेखा विभाग |
| १२. | श्री संजय मोरे | अधिक्षक आस्थापा विभाग |
| १३. | श्री.लक्ष्मण पाटील | प्र.सहा.आरोग्याधिकारी |
| १४. | श्री चंद्रकांत जाधव | प्र. मलेरीया पर्यवेक्षक |
| १५. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १६. | श्री गितेश सोनार | कनिष्ठ अभियंता , विद्युत विभाग |
| १७. | श्री.निखील टकले | कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग |
| १८. | श्री.राजेंद्र माईनकर | भांडारपाल, भांडार विभाग |
| १९. | श्री मधुकर निकुंभे | वसुली विभाग |
| २०. | श्री राजेश गायकवाड | लिपीक शिक्षणमंडळ |
| २१. | श्री.अनिल भडागे | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २२. | श्री सुर्यकांत हजारे | बाजार विभाग |
| २३. | श्री.रविकिरण पाटकरी | प्र.वृक्षसमिती प्रमुख |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे

विषय क्रमांक:-४९९ मागील प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक २८, २९ व ३० चे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४७७ दिनांक २२/०५/२०२५**

प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक २८ दिनांक ०४/०४/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ३८६ ते ४२४ क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक २९ दिनांक ०६/०५/२०२५च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४२५ ते ४६१ अखेर क्रमश:वाचून कायम करणेस मान्यता देण्यात येत आहे.

तसेच प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३० दिनांक ०८/०५/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४६२ ते ४७६ अखेर क्रमश:वाचून कायम करणेस मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५०० धुळे महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताधारकांकडे मालमत्ता कर व पाणी पट्टीकर थकबाकी वसूलीसाठी केलेल्या कार्यवाहीसाठी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४७८ दिनांक २२/०५/२०२५**

धुळे महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताधारकांकडे बऱ्याच प्रमाणात मालमत्ताकर व पाणी पट्टी कराची थकबाकी दिसुन येत आहे.अनेक वेळा शास्ती माफी देऊन, तसेच थकबाकीदारांना सततचा तगादा लावुनही थकबाकीदार फारसा प्रतिसाद देत नाही.

सन २०२४-२५ मालमत्ता कर व पाणी पट्टी कराचा थकबाकी सह संपुर्ण कराचा भरणा करणे बाबत तसेच वसुलीचे उद्दीष्ट पुर्ण करणेबाबत प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

त्यानुसार थकबाकी दारांच्या घरासमोर नेमुण दिलेल्या दोन टिमसाठी दिनांक ११/०२/२०२५ पासुन पुढील आदेश होईपावेतो मालमत्ता कर व पाणीपट्टी कराचा भरणा करणे बाबत वाजंत्री (ढोल ताशे) वाजविणेबाबत तातडीने कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने सदरचे काम तातडीचे असल्याने सदरच्या कामाबाबत अरमान हारुण मन्यार,धुळे त्यांच्याकडुन सदरचे काम करुन घेण्यात आलेले आहे सदरचे काम हे मजुरी चे असल्याने GST कर यांना लागु होत नसुन यांचे कुठलेही कर न कापता त्या अन्वये सदरच्या सेवाधारकां कडील बिलाप्रमाणे एकूण खर्च १,१२,०००/- मात्र सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार धुळे महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताधारकांकडे मालमत्ता कर व पाणी पट्टीकर थकबाकी वसूलीसाठी केलेल्या कार्यवाहीसाठी झालेला खर्च रुपये १,१२,०००/- मात्रला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) अन्वये कार्योत्तर मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५०१ धुळे मनपा हद्दीतील मनपा शाळा क्र. १७ च्या बाजूस दवाखाना बांधणे काम करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा उप अभियंता धुळे मनपा हद्दीतील मनपा शाळा क्रमांक १७ च्या बाजुस दवाखाना बांधणेबाबत आरोग्य विभाग मनपा यांचे पत्र प्राप्त झाले होते. अंदाजपत्रक तयार करुन निविदा मागविण्यात आली होती. त्यात ३ निविदा धारकांनी भाग घेतला होता. त्यात सर्वात कमी दराची निविदा अंदाजपत्रकीय दराने हेमंत राजाराम बागुल यांची आलेली आहे. दर मंजुरीस्तव विषय मे. स्थायी समितीसमोर सादर करण्यात आलेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४७९ दिनांक २२/०५/२०२५**

धुळे मनपा हद्दीतील मनपा शाळा क्र. 17 च्या बाजूस दवाखाना बांधणे कामास मा.आयुक्त सो., धुळे महानगरपालिका यांच्या दि.17/04/2025 अन्वये रक्कम रु. 1,35,51,520/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत उप अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ 20 / 2025-26 दिनांक 17/04/2025 अन्वये रक्कम रु. 1,35,51,520/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.हेमंत राजाराम बागुल | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |
| २ | श्री.भूषण एल. चौधरी | शे.१०% जास्तीने | |
| ३ | मे.आदर्श कन्सट्रक्शन | शे.५% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.हेमंत राजाराम बागुल , धुळे यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.हेमंत राजाराम बागूल , धुळे यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मान्यतेस्तव सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार धुळे मनपा हद्दीतील मनपा शाळा क्र. १७ च्या बाजूस दवाखाना बांधणे काम करणेकामी मे.हेमंत राजाराम बागूल , धुळे यांच्या अंदाजपत्रकीय निवीदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५०२ धुळे मनपा हद्दीतील मनपा मोगलाई साक्री रोड येथील टी.बी.सेंटर जवळ दवाखाना बांधणे काम करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

उपअभियंता धुळे मनपा हददीत मोगलाई साक्रीरोड येथील टीबी सेंटर जवळ दवाखाना बांधणे कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. अंदाजपत्रक तयार करुन ई निविदा मागविण्यात येवुन त्यात सर्वात कमी दराची निविदा इसाक शब्बीर शेख यांची शे. २.२१ टक्के कमीने

आलेली आहे. दर मंजुरीस्तव विषय मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक  सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४८० दिनांक २२/०५/२०२५**

धुळे मनपा हद्दीतील मनपा मोगलाई साक्री रोड येथील टी.बी.सेंटर जवळ दवाखाना बांधणे कामास मा.आयुक्त सो., धुळे महानगरपालिका यांच्या दि.15/04/2025 अन्वये रक्कम रु. 1,35,51,520/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत उप अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ 18 / 2025-26 दिनांक 15/04/2025 अन्वये रक्कम रु. 1,35,51,520/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | इसाक शब्बीर शेख | शे.२.२१% कमीने | सर्वात कमी दर |
| २ | यासीन अब्दुल जब्बार शेख | अंदाजपत्रकीय दराने | |
| ३ | भूषण एल. चौधरी | शे.२% कमीने | |
| ४ | फाहद मिर्झा | शे.३% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.इसाक शब्बीर शेख , धुळे यांचे दर शे.2.21% कमी दराने आहे सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, धुळे मनपा हद्दीतील मनपा मोगलाई साक्री रोड येथील टी.बी.सेंटर जवळ दवाखाना बांधणे काम करणेकामी मे.इसाक शब्बीर शेख, धुळे यांच्या शे.2.21% कमी या आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५०३  धुळे महानगरपालिका मालकीच्या अवधान गट नं. ६२/१ च्या जागेत सोलर प्रकल्प उभारणी करणेकामी DPR तयार करणे व तांत्रिक मान्यता घेणेसाठी प्रकल्प सल्लागार नियुक्तीकामी आलेलया निविदा दरांना मंजूरी देणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव  नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

उपअभियंता  अवधान येथे गट क्रं. ६२/१ सौर उर्जा प्रकल्प उभारणीसाठी डीपीआर तयार करणे, महापारेषण तसेच महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन आवश्यक तांत्रिक मान्यता व अनुषंगीक कार्यवाही करणे तसेच शासन स्तरावर निधीसाठी प्रस्ताव तयार करणेकामी पीएमसी (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) नेमणेकामी निविदा प्रसिध्द करणेत येवुन त्यात ३ निविदा धारकांनी सहभाग नोंदविला होता. तयात मे. हेरंब इंडस्ट्रीज धारकांनी सहभाग नोंदवला होता. त्यात मे. हेरंब इंडस्ट्रीज, छत्रपती संभाजीनगर यांचे सर्वात कमी दर आले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक  यात आपले डीपीआर व upto TS राहिल मग त्यानंतर PDMC चा रोल राहिल म्हणजे upto TS ची रक्कम द्यावी लागेल. हे इम्पॅनल्ड आहे का मेडाला किंवा इतर आहे.

उपअभियंता  इम्पॅनल्ड आहेत.

मा. आयुक्त तथा प्रशासक  हे upto TS पर्यंत घ्यावे. डीपीआर मंजुर TS करणे हाच आपला रोल राहिल. यापुर्वी पैसे नाही मिळाले तर पुढील टप्प्यात मिळतील. यात २ गोष्टी असतील एमएसईबी चे ग्रीड कनेक्टीव्हीटी चे आपल्याला करावे लागेल. आणि तेथे सिव्हील वर्क जसे फॅब्रीकेशन,

कंपाऊंड वॉल, आतील ROW ची सर्व कामे, आतील रस्ते या सगळयाचा एकत्रीत डीपीआर बनेल. तेवढया फेजपर्यंत आपण लिमीटेड राहु. आपल्याला माहित नाही एकत्रित TS होणार किंवा काय. महाउर्जाकडे सोलर व इलेक्ट्रीक चे काम होईल किंवा ते सांगु शकता इलेक्ट्रीकचे सिनीअर इंजिनिअरकडुन करा. पीडब्लडी च्या सिनिअर इंजिनियरकडुन ROW चे करावे लागेल व सिव्हील वर्कचे याचे बायफरगेशन होईल. ठेकेदाराने DPR बनवायचे व TS करुन द्यायचे वेगवेगळया संस्थांकडुन किंवा एकत्रित करुन दिले महाउर्जाने तर ठिक आहे. पुढील कार्यवाही पुढील फेजमध्ये करावी. फेज १ पर्यंत कार्यादेश द्यावा नंतर टप्प्याटप्प्याने स्वतंत्र निर्णय घेवु. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४८१ दिनांक २२/०५/२०२५**

धुळे महानगरपालिका मार्फत गट नं.६२/१ अवधान येथे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी करण्यासाठी DPR (तपशील प्रकल्प अहवाल) तयार करणे,महापारेषण तसेच महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आवश्यक तांत्रिक मान्यता व अनुषंगिक कार्यवाही करणे तसेच शासन स्तरावर निधी साठी प्रस्ताव तयार करणे कामी उक्त कामी तज्ञ PMC (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) नेमणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती प्रशासक ठराव क्र.१५० दि. ०६/०५/२०२५ मा. आयुक्त/ उपायुक्त धुळे महानगरपालिका/मा. जिल्हाधिकारी सो. यांची प्रशासकीय ठराव अन्वये रोजी अन्वये उक्त कामाबाबततात तज्ञ PMC (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) नेमणे बाबत ई-निविदा प्रक्रिया करणेस मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविणेत आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत Online पद्धतीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. कार्पोरेट असोसीएटस, छत्रपती संभाजीनगर | २,००,००,०००/- | |
| २ | मे. हेरंब इंडस्ट्रीज, छत्रपती संभाजीनगर | १,३०,००,०००/- | L1 |
| ३ | मे. बालाजी इंटरप्रायझेस, छत्रपती संभाजीनगर | १,७०,००,०००/- | |

उपरोक्त ठेकेदार पैकी L-१ निविदाधारक मे. हेरंब इंडस्ट्रीज, छत्रपती संभाजीनगर यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु.१,३०,००,०००/- इतक्या रकमेची आहे.धुळे महानगरपालिका मार्फत गट नं.६२/१ अवधान येथे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी कामाच्या DPR (तपशील प्रकल्प अहवाल) तयार करणे,सर्वेक्षण,अंदाजपत्रक महापारेषण तसेच महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आवश्यक तांत्रिक मान्यता व अनुषंगिक कार्यवाही करणे टप्प्यापर्यंत निविदा - दर नमूद करणे कामी मे. हेरंब इंडस्ट्रीज, छत्रपती संभाजीनगर यांना धुमपा/ पत्र/ विवि/५९ दि.२२/०५/२०२५ नुसार दर विभाजनीकामी कळविण्यात आले होते,त्यानुसार निविदाधारक मे. हेरंब इंडस्ट्रीज, छत्रपती संभाजीनगर यांनी पत्र क्र. दि. २२/०५/२०२५ च्या पत्रानुसार त्यांनी दिलेले टप्प्यानिहाय दर दिले आहेत.

धुळे महानगरपालिका मार्फत गट नं.६२/१ अवधान येथे सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी करण्यासाठी DPR (तपशील प्रकल्प अहवाल) तयार करणे,महापारेषण तसेच महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आवश्यक तांत्रिक मान्यता व अनुषंगिक कार्यवाही करणे तसेच शासन स्तरावर निधी साठी प्रस्ताव तयार करणे कामी उक्त कामी तज्ञ PMC (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार) नेमणे कामा करीता मे. हेरंब इंडस्ट्रीज, छत्रपती संभाजीनगर यांची नियुक्ती करणेकामी प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, धुळे महानगरपालिका मालकीच्या अवधान गट नं. ६२/१ च्या जागेत सोलर प्रकल्प उभारणी करणेकामी DPR तयार करणे व तांत्रिक मान्यता घेणेसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे. हेरंब इंडस्ट्रीज, छत्रपती संभाजीनगर यांची नियुक्ती खालील टप्प्यापर्यंत व सादर केलेल्या दरानुसार करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| Stages | Nature of Services | CONSULTANCY Fees (in Rupees) |
| --- | --- | --- |
| 1 | Stage - DPR , Planning , Survey, Design , Estimation, Costing and Sanctioning सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी कामाच्या DPR (तपशील प्रकल्प अहवाल) तयार करणे,सर्वेक्षण,अंदाजपत्रक महापारेषण तसेच महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आवश्यक तांत्रिक मान्यता व अनुषंगिक कार्यवाही करणे. | 1) **Phase 1:** Detailed Project Report (DPR) & Initial PMC Setup (Total: 25-35%) (Depends upon negotiation) |

उक्त कामी पुढील टप्प्यांबाबत स्वतंत्र निर्णय घेणेत येईल. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**